# G01/G29/POL225/BAC308/EE/20160523

**वेळ : 3 तास** **गुण : 80**

**सर्वसाधारण सूचना :**

1. सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.
2. प्रत्येक उप-प्रश्न पाच गुणांचा आहे.
3. प्रत्येक उप-प्रश्नांचे उत्तर 75 ते 100 शब्दांत लिहा. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर स्वतंत्र पृष्ठावर लिहावे.
4. 80 गुणांच्या प्रश्नपत्रिकेचे आपल्या शिक्षणक्रमाच्या संरचनेनुसार गुणांत रूपांतर करण्यात येईल.

---

1. खालीलपैकी कोणतेही **चार** उप-प्रश्न सोडवा.
   a) भारतीय घटनेने भारतीय नागरिकाला स्वातंत्र्य प्रदान करणारे कोणते हक्क दिले आहेत, कोणतेही पाच लिहा. 5
   b) भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील कोणतेही पाच आव्हाने थोडक्यात स्पष्ट करा. 5
   c) ब्रिटीश राजवटीत आदिवासींचे झालेले शोषण थोडक्यात विशद करा. 5
   d) दैनंदिन जीवनात लोक कोणत्या प्रकारे जंगलांवर अवलंबून असतात, ते थोडक्यात स्पष्ट करा. 5
   e) बांधकाम व्यवसायातील स्त्री मजुरांच्या समस्या थोडक्यात लिहा. 5

2. खालीलपैकी कोणतेही **चार** उप-प्रश्न सोडवा.
   a) वनमजुर कोणकोणती कामे करतात ते थोडक्यात लिहा. 5
   b) रोजगार हमी योजनेअंतर्गत असणाऱ्या मजुरांच्या छावण्यांच्या ठिकाणी कोणकोणत्या सोयी असाव्यात ते स्पष्ट करा. 5
   c) श्रमशक्तीतून ग्रामविकास या योजनेचे स्वरूप थोडक्यात स्पष्ट करा. 5
   d) शेतमजूरांच्या चळवळीने वेळोवेळी कोणत्या मागण्या केल्या होत्या? कोणत्याही पाच लिहा. 5
   e) आर्थिक विकासाच्या विविध योजना असूनही आदिवासींची स्थिती दयनीय का आहे, ते थोडक्यात लिहा. 5

3. खालीलपैकी कोणतेही **चार** उप-प्रश्न सोडवा.
   a) राज्यघटनेतील कोणतीही पाच मूलभूत कर्तव्ये लिहा. 5
   b) ग्रामस्वराज्य व रोजगार हक्क यांचा विकास कशा पद्धतीने झाला ते थोडक्यात स्पष्ट करा. 5
   c) मजूर संघटनेच्या कार्यपद्धतीचा थोडक्यात आढावा लिहा. 5
   d) पंडीत नेहरूजींनी सांगितलेली 'आदिवासी पंचशील' तत्वे कोणती ते लिहा. 5
   e) आदिवासी उपाय योजनेअंतर्गत न्युक्लिअस बजेटच्या विविध योजना कोणत्या ते थोडक्यात लिहा. 5



http://www.ycmouonline.com

4. खालीलपैकी कोणतेही **चार** उप-प्रश्न सोडवा.

a) भारतीय संविधानातील रोजगार हक्कांच्या तरतुदी लिहा. 5

b) 1988 च्या वननीतिची वैशिष्ट्ये लिहा. 5

c) बांधकाम मजुर संघटीत होण्याच्या मार्गातील पाच अडथळे सविस्तर लिहा. 5

d) अल्प व अत्यल्प भूधारक या संज्ञेत कोणत्या शेतकऱ्यांचा समावेश होतो ते थोडक्यात स्पष्ट करा. 5

e) शेतमजुरांच्या जीवनात असुरक्षितता का येते? 5



http://www.ycmouonline.com